# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/ २३७६/२०१८-१९ दिनांक:- २०/११/१८

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५

M.A. (Legal) 1808 U.A.

प्रति,
श्रीम. कल्पना लोभे
जनतादल सेक्युलर मुंबई, 10, सीडीओ अपो., योगक्षेम, जीवन बीमा मार्ग, चर्चगेट, मुंबई-400020.

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.
संदर्भ - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला दि.01/11/2018 रोजीचा अर्ज. (जो या कार्यालयास आवक क्र. मा.अ./2317/18-19, दि.03/11/2018 अन्वये प्राप्त)

महोदया,

विषयांकित प्रकरणी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्राप्त आपल्या संदर्भित अर्जाचे अनुषंगाने आपण अपेक्षिलेली माहिती मुद्देनिहाय खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.अे ते इ** - मौजे खारी, स.क्र.127/7,8, 2/7,8 या जागेसाठी पत्र क्र. मनपा/नर/1406/12-13, दि.22/06/12 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी दिलेली असून सदर मंजुर संचिकेत उपलब्ध असलेल्या नकाशाची व कागदपत्रांच्या छायाप्रतीसाठी खालील प्रमाणे शासकीय शुल्काचा भरणा भरुन सदरच्या छायाप्रती कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन घ्याव्यात.

| | | छायाप्रती प्रति प्रत | सत्यप्रती प्रति प्रत |
|---|---|---|---|
| मंजुर नकाशा | - | रु.150/- | रू. 500/- |
| बांधकाम परवानगी | - | रु.10/- | रू. 100/- |
| इतर कागदपत्रे | - | रु.2/- | ----- |

**मुद्दा क्र. एफ, जी, आय,जे** - सदर मुद्दा हा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाशी संबंधित असल्यामुळे आपले संदर्भिय पत्र सदर विभागास वर्ग करणेत येत आहे. कृपया सदर विभागाकडून आपणांस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

**मुद्दा क्र. एच** - सदर मुद्दा हा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागाशी संबंधित असल्यामुळे आपले संदर्भिय पत्र सदर विभागास वर्ग करणेत येत आहे. कृपया सदर विभागाकडून आपणांस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपणास प्रथम अपील हे श्री. हे.रा. ठाकूर, प्रथम अपीलीय अधिकारी तथा नगररचनाकार, नगररचना विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत दाखल करता येईल.

आपला

**(केशव शिंदे)**
**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक नगररचनाकार**
**नगररचना विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत पुढील कार्यवाहीस्तव -

1) मा. जन माहिती अधिकारी,
अतिक्रमण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका
यांनी संदर्भिय पत्रातील मुद्दा क्र. **एफ, जी, आय,जे** च्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित माहिती अर्जदारास विहित मुदतीत देण्यात यावी. (सोबत संदर्भिय पत्राची छायाप्रत.)

2) मा. जन माहिती अधिकारी
विधी विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
यांनी संदर्भिय पत्रातील मुद्दा क्र. एच च्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित माहिती अर्जदारास विहित मुदतीत देण्यात यावी. (सोबत संदर्भिय पत्राची छायाप्रत.)

Application for obtaining information under
The Right to Information Act 2005

To,
**The Information Officer, (Town Planning Depot)**
**Building & Factory Proposal Department**
**Mira Bhayander Municipal Corporation,**
**Bhayander West, Thane 401 105,**

1) Name of the Applicant : Kalapana Lobhe
2) Address : JANTADAL SECULAR MUMBAI
10.C.D.O. OPP.YOUGAKSHEM
JEEVAN BIMA MARG
CHURCHAGATE MUMBAI 400020
MOBILE NO- 7678038675

2) The Periods of Information: 2010 to 2018

(ii) Description of information required :

a) The name of Owner and architect, whose name the permission granted and/or Plan Sanctioned for Construction of Bldg. Old Survey No. 127 & 128 New Survey No. 02, Hissa No. 7 & 8, Khari Gaon, Near Venkatesh Park, Bhayander East 401105,

b) That the Details of Sanctions Plan of the Building with F.S.I. and Measurement etc.

c) The I.O.D. C.C. and O.C. if have granted, copy of all the papers.

d) Whether any permission has been granted to any of the Building & Owner additional alteration or removal of Basement, Balcony and covered the terrace. The details of permission and name of applicant with Building,

e) Whether any action has been taken against Unauthorized Constructions of Building and/or any Part thereof.

f) Whether any Notice has been issued against the Unauthorized Constructions.

g) Total Number of Building and Shop, Flat and Size, the copy of action report of . Demolition of unauthorized constructions and illegal covered area.

h) Whether any case is pending in Court against Demolition action.

i) The Name of officer responsible and authorized for demolition the unauthorized work of said Building, Shop and Flat.

j) At present who will take action for Demolition at present unauthorized work.

(iii) Whether information is required by post or in person. : In Person (hand Delivery)

(iv) Certified cop : Certified copy of all documents Referred Above, applicant undertake To pay urgent charges.

## VERIFICATION

I, **Kalapana Lobhe** do hereby declare that whatever information furnished above details / particulars are true and correct. The information sought for the purpose of record.

Place: **Mira Bhayander**

Date- 01/11/2018

K.Lobhe

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०३/२०१८-१९
दि. २६/११/२०१८

**प्रति,**

श्रीम. कल्पना लोभे
१० सी.डी.ओ. योगाक्षेमच्या समोर,
जिवन बीमा मार्ग, चर्चगेट, मुंबई ४०००२०

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** १) आपला दि. ०१/११/२०१८ रोजीचा अर्ज.
२) नगररचना विभागाचे दि. २०/११/२०१८ (प्राप्त दि.२२/११/२०१८) रोजीचे पत्र.

**महोदय,**

आपण संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण मौजे खारी, सं. क्र. १२७ व १२८ जुना, २ नविन, हि. क्र. ७ व ८ या जागेबाबतची माहिती अपेक्षिली आहे. सदर अर्जातील मुद्दा क्र. "एच" विधी विभागाशी संबंधित असल्याने नगररचना विभागाने सदरचा अर्ज विधी विभागास वर्ग केलेला आहे. तरी आपणास खालीलप्रमाणे माहिती देत आहे.

**मुद्दा क्र. एच :-** वरील सर्व्हे क्रमांकाबाबत विधी विभागातील संगणक आज्ञाप्रणालीमध्ये शोध घेतला असता मनपाविरुद्ध दावा दाखल झाल्याची नोंद आढळून आलेली नाही. तरी आपणास कळविण्यात येते की, यापुढे आपणास कोणत्या दाव्यांची माहिती आवश्यक असल्यास मनपाच्या www.mbmcrti.com या संकेतस्थळावरून माहिती उपलब्ध करून घेता येईल.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. विजयकुमार म्हसाळ, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Swadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका